Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारतीय राज्यघटना आणि बौद्ध तत्त्वज्ञान: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

**प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे**
वसंतराव नाईक महाविद्यालय, म्हसळा
ता. म्हसळा जि. रायगड.पिन ४०२ १०५
फोन. **9421166999, 8421654402**
**Email:-** sanjaybendre927@gmail.com

**प्रस्थावना ;**

अखंडविश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी विश्वामध्ये एकता आणि अखंडीता निर्माण करण्यासाठी जे प्रयेत्न केले होते व त्यातून विश्वात जी स्थिरता निर्माण झाली होती. तशीच स्थिरता भारताला स्वतंत्र मिळाल्या नंतर या देशात नांदावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी ज्या वेळी भारतीय राज्यघटना बनवावयास घेतली त्यावेळी या देशातील विषमता नष्ठ करून एकता निर्माण व्हावी, येथील जातीयता संपावी व भेदाभेदीला मूठमाती द्यावी या उदात्त हेतूने डॉ. बाबासाहेबांनी राज्यघटना बनवण्यास सुरुवात केली व ती करत असताना डोळ्यापुढे गौतमबुद्धाच्या वेळचा भारत त्यांनी समोर ठेवला. त्या साठी त्यांना २ वर्ष ११ महिने व १८ दिवस कष्ठ उपसावे लागले व त्यातून एक सुंदर असे भारतीय संविधान बनले गेले. या सुंदर संविधानातून त्यांनी देश बौद्धमय कसा केला याचा आढावा घेऊया.

**बाबासाहेब पूर्व काळ :-**

बाबासाहेबांनी घटना बनवली व ती लागू करून तमाम भारतीयांमध्ये एकोपा प्रस्थापित करण्याचा, धार्मिकता व जातीयता दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीय घटना अस्थित्वात येण्याच्या आगोदर बाबासाहेबांचे बालपण ते त्यांचा पुर्वातिहास पाहिल्यास आपणास असे दिसून येते की त्या काळात मोठ्या प्रमाणात धार्मिक गुंतागुंत, पुरोहीतांचे प्राबल्य, विविध प्रकारचे यज्ञ, जातीभेद, वर्णभेद, भाषाभेद, बुद्धिभेद, अंधश्रद्धा, आस्तिकता, कर्मकांड, प्राणीहत्या,देवदेवता, भोगविलाशी जीवन इत्यादी अनेक अवगुण समाजाला चिकटून राहिले होते, आणि झळ बाबासाहेबांना झाली होती. म्हणून बाबासाहेबांना या जोखडातून स्वता:ला व आपल्या समाजालाही बाहेर काढावे म्हणून त्यांनी शिक्षण घेत असतानाच काय उपाय योजना करता येयील याचा ते सातत्याने विचार करीत होते.

**बाबासाहेब बौद्ध धम्माकडे आकर्षित :-**

बाबासाहेबांना हिंदू धर्मातील वरील सर्व समस्यांची सोडवणूक करून तमाम बहुजनांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी बाबासाहेबांनी अनेक धर्मांचा सारासार विचार करून जो धम्म मानवाला मानवाप्रमाणे वागवतो, मानवतेचे आचरण करतो अशा धम्माकडे म्हणजेच बौध्द धम्माकडे बाबासाहेब आकृस्ट झाले व या धम्मातील अनेक बारीक सारीक गोष्टीचा विचार करून आपल्या समस्येला वाचा फोडणारा व आपल्याला अभिप्रेत असणारा धम्म बाबासाहेबांना दिसला. आपल्याला मानव म्हणून मुक्त वातावरणात जगू देणारा हाच धम्म आहे म्हणूनच बाबासाहेबांनी नाशिक जिल्ह्यातील येवला येथील परिषदेत एक भीम गर्जना केली की, ‘मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मारणार नाही’. आणि ही गर्जना बाबासाहेबांनी खरी करून दाखवली. त्यांनी नागपूर मुक्कामी १४ ऑक्टोबर १९५६ ला बौध्द धम्माची दिक्षा घेतली व ते बौद्ध झाले.

**बाबासाहेब राज्यघटना बनवतात :-**

ऑगस्ट १९४७मध्ये भारतीय घटना समितीनेएक मसुदा समिती निर्माण केली व तिचे अध्यक्ष बाबासाहेब होते.घटनेतील मसुदा हाच महत्वाचा असतो त्यातील महत्वाचे मुद्देच पुढे राज्यघटनेत समाविष्ट करण्यात येत होते. अशा रीतीने बाबासाहेबांनी २ वर्ष ११ महिने व १८ दिवस मेहनत घेऊन २६ जानेवारी १९५० मध्ये राष्टपतींच्या स्वाक्षरीने घटना संपूर्ण देशात लागू करण्यात आली. या घटनेत ३९५ कलमे व ८ परीशीष्टे सामावली आहेत व ती सर्व लिखित स्वरुपात आहेत. आपली राज्यघटना जगातील सर्वात मोठी राज्यघटना आहे.

**घटनेत बौद्ध धम्म :-**

**i ) घटना :-**

बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या सरनाम्यात अतिशय मोजक्या पण अचूक व परिणामकारक राज्यघटनेची उदिष्टे स्पष्ठ केली आहेत. त्यात न्याय, स्वतंत्र, समता व बंधुता यांचा स्वीकार केला.

**i ) बौध्द धम्म :-**

बाबासाहेबांनी वरील उदिष्टे ही बौध्द धम्मातून घेतली आहेत. तथागत म्हणतात की मानवाने पंचशीलाचे पालन करावे सर्वांशी न्यायाने वागावे,सर्वांना समानतेने वागवावे आपण सर्व मानवजातीने भावाच्या नात्याने कृत्य करावे.म्हणजेच बाबासाहेबांनी स्वातंत्र,समता व बंधुता ही तत्वे बौद्ध धम्मातून घेतली होती असे दिसून येते.

ii ) घटना :- सार्वभौम, समाजवादी, धर्मातीत, लोकशाही प्रजासत्ताक

बाबासाहेबांनी घटनेच्या सरनाम्यात भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मातीत, लोकशाही असल्याचे घोषित करण्यात आले आहे. येथील प्रजा ही सार्वभौम असून तीच त्यांची शक्ती आहे तसेच सर्व धर्माला समान लेखून त्यांना समान वागणूक देण्यात येईल कोणावरही अन्याय व अत्याचार होणार नाही अशी तत्वे बाबासाहेबांनी घटनेत समाविष्ट केली आहेत.

ii) बौद्ध धम्म :-

तथागथानी आपल्याला एक प्रत्येक प्रवचनामध्ये मानवतेचा स्वीकार केल्याचे आपल्याला दिसून येते. समाजात व धर्मातील उच्च नीचतेची उतरंड उतरवण्याची व सर्व व्यक्ती या समान व प्रत्येकाला आपापल्या आचार विचाराने जगता येते असे बोल बौद्ध धम्मात आहेत. हीच खरी लोकशाही आहे. धम्मात दुसर्यांच्या कल्याणाचा विचार केला आहे. म्हणजेच समाजवादी विचार आहेत.

तीच तत्वे बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून सर्व भारतभर लोकांमध्ये कायद्याच्या चौकटीत राहून पाळण्यास सांगितली.

iii ) घटना:-

अनुच्छेद १५ व अनुच्छेद १६ मध्ये बाबासाहेबांनी धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान आणि निवास या कारणामुळे आपल्या सोबत भेदभाव होणार नाही हे नमूद केले आहे.

iii ) बौद्ध धम्म :-

तथागथानच्या काळात कोणताही पंथ व संप्रदया हा अस्थित्वात नव्हता. पण तथागथांच्या निर्वाणानंतर फक्त हीनयान व महायान हे दोन पंथ निर्माण झाले पण यांनी जातीयता, पंथ, प्रांत, जात यांना दूरच ठेवले होते. बौद्ध धम्मात दया, शांती, अपरिग्रह ही तत्वे सांगितली आहेत. हिंदू धर्मात ब्राह्मण, वैश्य, क्षेत्रिय व शुद्र असे चार वर्ण सांगितले आहेत पण या चारी वर्णात वरच्या पेक्षा खालचा शुद्र आहे पण बौद्ध धम्मात वरील सर्वांना समानतेने वागवण्याची पुष्टी केली आहे. कोणीही जन्मामुळे नीच होत नाही तर त्याचे कर्म महत्वाचे आहे.बौद्ध धम्मात सांगितले आहे की, माणूस कर्मानेच शुद्र होतो तसेच कर्मानेच तो ब्राह्मण होतो. केवळ त्या वर्णात जन्माला म्हणून तो ब्राह्मण होत नाही.

ब्राह्मण कर्मानेच होतो. म्हणूनच बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या वरील कलमाद्वारे सर्वांना समानतेने वागवावे म्हणून ही कलमे त्या मध्ये समाविष्ट केली आहेत. म्हणून तर आज दुकाने, सार्वजनिक हॉटेल, सिनेमाहॉल, तलाव, विहीर, रस्ते, आंघोळीचे घाट अथवा सार्वजनिक वापरावयाच्या जागा येथे, जात-धर्म-लिंग-कुळ या वरून रोखले जाणार नाही.

iv ) **घटना :-**

अनुच्छेद १२ ते ३५ पर्यंत बाबासाहेबांनी मुलभूत हक्कांची चर्चा करण्यात आली आहे. शिक्षण घेण्याचा अधिकार, धार्मिक स्वतंत्र, मालमत्ता मिळवण्याच्या अधिकार, अन्यायाविरुद्ध दादमागण्याच्या अधिकार, कोठेही वास्त्येव्य करण्याचे स्वतंत्र, आपल्या संस्कृती प्रमाणे वागण्याचा अधिकार.

iv ) **बौद्ध धम्मात :-**

बौद्ध धम्मात निसर्गाने निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूवर मानवाचा समान अधिकार आहे. या सर्व वस्तूंचा उपभोग घेण्याचा सर्वांना अधिकार असल्याचे प्रतिपादन केले आहे. म्हणजेच तथागतांनी सामातावादी विचार मांडले आहेत. धर्मावर ब्राहामनांचे वर्चेश्व असल्याने व यज्ञ आहुती यज्ञबळी, सोमरस या बाबी खर्चिक होत्या पण तथागतांनी या धार्मिक विधिना विरोध केला व प्रत्येकाला आपल्या विचार सामर्थ्याने जगण्याच्या अधिकार असल्याचे प्रतिपादन करून धार्मिक स्वतंत्र दिले.

म्हणूनच बाबासाहेबांनी राज्यघटनेत धार्मिक बाबतीत स्वातंत्र दिले धर्म बदलण्याचा, धार्मिक प्रथा न पाळण्याच्या कलमे घातली आहेत.

v ) **घटना :-  तिरंग्या झेंड्यात अशोक चक्र**

२२ जुलै १९४७ रोजी घटना समितीची बैठक पार पडली. या बैठकीत तिरंगा ध्वज भारताचा अधिकृत राष्ट ध्वज म्हणून स्वीकृत करण्यात आला. व त्या ध्वजामध्ये अशोक चक्र हे निळ्या रंगात बसवण्यात आले, व त्याची बाबासाहेबांनी अंमलबजावणी केली.

v ) **बौद्ध धम्म :-**

सम्राट अशोकाने जेंव्हा बौद्ध धम्म स्वीकारला तेंव्हा पासून त्यांनी आपले आचरण बदलले होते. ते जेंव्हा पहिल्यांदा सारनाथ येथे आले होते. तेंव्हा त्यांनी २४ आरे असणारे चक्र शिलालेखावर कोरवून घेतले.या धम्मचक्राचा अर्थ भगवान गौतम बुद्धाने अविद्या पासून दु:खापर्यंत १२  अवस्था व दु:खापासून निर्वाणापर्यंत १२ अशा एकून २४ आवस्थांचे चित्रण केले आहे.

vi ) **घटना :-** **भारताची राजमुद्रा राजचिन्ह व सत्यमेव जयते**

२६ जानेवारी १९५० रोजी म्हणजेच राज्यघटनेच्या पहिल्याच वर्षी भारतीय घटना समितीने प्रजासत्ताक दिना दिवशी चार सिंह असलेली व सारनाथ स्थितः ही मुद्रा भारताची राजमुद्रा म्हणून स्वीकारली आहे.

vi ) **बौद्ध धम्म :-**

बौद्ध धम्मामध्ये अशोकाने निर्माणकेलेल्या चार सिंह व खाली अशोक चक्र व त्यावर लिहिलेले " सत्यमेव जयते " हे प्रतीक आहे.व त्या काळात भारतीय हा बौद्ध धम्म जागतिक पातळीवर जो पोहचला गेला त्याचे हे प्रतीक पूर्ण विश्वभर प्रसारित झाले गेले. जागतिक पातळीवर चीन, भूतान, नेपाल, बाली, बोर्नियो, इंडोनिया, जावा, सुमात्रा, येथेही बौद्ध धम्म पोहचला गेला. पण बौद्ध धम्माचे प्रतीक सर्वत्र मान्यता पावले.

vii ) **घटना:-**

२ जानेवारी , १९५४ पासून घटनेत नमूद केल्या नुसार भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार " **भारतरत्न** " निर्मिती

vii ) भारताचा हा सर्वोच्य नागारी पुरस्काराचे नाव बौद्ध धम्माशी संबंधित आहे. बौद्ध धम्मात सर्वश्रेष्ट व्यक्तींना ' रत्न 'या नावाने पदवी दिली जाते.अनेक बुद्ध भिक्कुंची नवे ' रत्न ' नावाशी संबंधित आहेत.

उदा. १ ) भन्ते ज्योतीरत्न

२) भन्ते संघरत्न

३) भन्ते शांतीरत्न

४) भन्ते जोतीरत्न

भारतरत्न हा पुरस्कार पिंपळाच्या पानावर ( त्याचा आकार ) दिला जातो. त्याच्या एका बाजूला सोनेरी अक्षरात तो घेणार्याचे नाव तर दुसर्या बाजूला चार सिंह असलेली राजमुद्रा व धम्मचक्र कोरलेले आढळून येते.

viii ) **घटना :-** घटनेत राष्ट्रीय फुल म्हणून ' कमळ ' या फुलाचा स्वीकार केला गेला.

**viii ) बौद्ध धम्म :-**

बौद्ध धम्मामध्ये मैत्री, प्रेम व करून यांचे प्रतीक म्हणून कमळाच्या फुलाला सर्वोच्च स्थान आहे. थाईलंड, श्रीलंका, म्यानमार या बौद्ध राष्ट्रांत तसेच तथागत गौतम बुद्धाच्या चरणावर कमळाचे फुल समर्पित केले जाते.

**संदर्भ साधने :-**

१) शेरे नीलकंठ — आंबेडकर वाद, सुविद्या प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००९
२) गायकवाड जयदेव . — संविधान—सभेत डॉ. आंबेडकर पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती,२०००
३) काशप विश्वास . — महामानव – मी बुद्धीष्ठ फौंडेशन मुंबई, प्रथम आवृत्ती २०१७
४) किर धनंजयं — डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्योपुलर प्रकाशन मुंबई, दुसरी . . आवृत्ती, १९९०
५) सोनावणे विनयकुमार — मुलाखत, दिनांक २५/०५ /२०२१.